पुढारी

# नवनिर्मितीतून शाश्वत विकासाकडे प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या नवोपक्रमाच्या माध्यमातून नावीन्यपूर्ण संकल्पनेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. याअंतर्गत नवनिर्मितीतून शाश्वत विकासाकडे प्रस्ताव सादर करण्यास ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

पुरातन काळापासून मानवी जीवनातील अमूलाग्र बदल हे साध्या व नावीन्यपूर्ण संकल्पनेतून घडत गेले आहेत. काही लोक संशोधनाद्वारे नावीन्यपूर्णतिला मूर्त स्वरूप देतात. शिवाजी विद्यापीठ अशा सामान्यांतील नावीन्यपूर्ण संशोधकांना आमंत्रित करत आहे. यासाठी शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. केंद्रांतर्गत 'एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन' सेक्शन आठ कंपनी कायदा, २०१३ नुसार रितसर नोंदणी केली आहे. नावीन्यपूर्ण कल्पना केंद्रामार्फत पोहोचवाव्यात. नावीन्यपूर्ण कल्पनांचे अधिकार अबाधित राहतील व त्याची गोपनीयता सांभाळली जाईल. सर्व सहभागी व्यक्तींना प्रमाणपत्र व काही दर्जेदार, निवडक प्रकल्पांना रोख बक्षीस दिले जाईल. प्रभावी, कार्यक्षम कल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी विद्यापीठ तांत्रिक सहाय्य प्रदान करणार आहे. यासाठी नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले आहे.

Kolhapur Edition
Sep 23, 2021 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठामार्फत नावीन्यपूर्ण संकल्पनांना व्यासपीठ

**कोल्हापूर :** नवसंकल्पनांना संधी उपलब्ध करून१/दे४याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाच्या वतीने नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राची स्थापना करण्यात आली असून, इच्छुकांनी आपल्या संकल्पना अधिकृत संकेतस्थळावर ३० सप्टेंबरपर्यंत पाठवाव्यात, असे आवाहन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांच्याकडून करण्यात येत आहे. संचालक देशमुख म्हणाले, या केंद्राच्या अंतर्गत एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन या सेक्शन आठ कंपनी कायदा, २०१३ नुसार रीतसर नोंदणी करण्यात आली आहे. तुमच्या नावीन्यपूर्ण कल्पना ज्या टप्प्यावर (उदा. कल्पना, प्रक्रिया, नमुना) आहेत त्या आमच्यापर्यंत पोहोचवा. या केंद्रामार्फत आम्ही त्याला योग्य व्यासपीठ मिळेल याची खात्री आहे. तुमच्या नावीन्यपूर्ण कल्पनांचे अधिकार अबाधित राहतील व त्याची गोपनीयता सांभाळली जाणार आहे. सर्व सहभागी व्यक्तींना प्रमाणपत्र दिले जाईल तसेच काही दर्जेदार व निवडक प्रकल्पांना रोख बक्षीस दिले जाणार आहे. ज्या प्रभावी, कार्यक्षम कल्पना असतील अशा कल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी शिवाजी विद्यापीठ तांत्रिक साहाय्य प्रदान करणार आहे.

तरुण भारत

# नवनिर्मितीतून 'शाश्वत विकास' प्रस्तावास मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात नवोपक्रम, नवसंशोधन व सहचर्य केंद्राची स्थापना केली आहे. या केंद्रांतर्गत एसयुके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फौंडेशनची नोंदणी केली आहे. या केंद्रांतर्गत नाविण्यपूर्ण संकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी इच्छुकांनी विद्यापीठाला पाठवण्यासाठीच्या प्रस्तावास ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. तरी इच्छुकांनी केंद्राशी संपर्क साधावा अथवा sciil‡unishivaji.ac.in यावर संकल्पना पाठवाव्यात, असे आवाहन केंद्र संचालक डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले आहे. शिवाजी विद्यापीठ नाविन्यपूर्ण संशोधकांना आमंत्रित करत आहे. अशा नवकल्पनांच्या संगोपनासाठी संधी देण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. तरी इच्छुकांनी विद्यापीठाशी संपर्क साधावा.

पुढारी

# नावीन्यपूर्ण संकल्पनेत सहभागी होण्याचे विद्यापीठाचे आवाहन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या नवोपक्रमाच्या माध्यमातून नावीन्यपूर्ण संकल्पनेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ३० सप्टेंबरपर्यंत नवनिर्मितीतून शाश्वत विकासाकडे प्रस्ताव सादर करता येणार आहेत.

शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. त्यानुसार सामान्यांतील नावीन्यपूर्ण संशोधकांना आमंत्रित करण्यात येत आहे. नावीन्यपूर्ण कल्पना केंद्रामार्फत पोहोचविल्या जाणार आहेत. प्रभावी, कार्यक्षम कल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी विद्यापीठ तांत्रिक सहाय्य प्रदान करणार आहे, अशी माहिती केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी दिली.

My Kolhapur Edition
Sep 27, 2021 Page No. 10
newspaper.pudhari.co.in

सकाळ



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे अभिनंदन करताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. एम. एस. देशमुख आदी.**

# शिवाजी युनिव्हर्सिटी रिसर्च फाउंडेशन अध्यक्षपदी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळांतर्गत स्थापन केलेल्या 'शिवाजी युनिव्हर्सिटी रिसर्च अॅण्ड डेव्हलपमेंट फाउंडेशन' कंपनीच्या (सेक्शन-८) अध्यक्षपदी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची निवड झाली. कंपनीच्या संचालक मंडळाची पहिली बैठक विद्यापीठ कार्यालयात झाली. त्यामध्ये कुलगुरू डॉ. शिर्के यांची एकमताने निवड झाली. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ आणि ग्रंथभेट देऊन अध्यक्षांचे अभिनंदन आणि स्वागत केले. बैठकीस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# 'रिसर्च डेव्हलपमेंट' च्या अध्यक्षपदी कुलगुरू शिर्के



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ यांच्या अंतर्गत स्थापन केलेल्या 'शिवाजी युनिव्हर्सिटी रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन' कंपनी (सेक्शन-८)च्या अध्यक्षपदी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची निवड केली आहे.

कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक मंगळवारी विद्यापीठ कार्यालयात झाली. या बैठकीमध्ये कुलगुरू डॉ. शिर्के यांची अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व ग्रंथभेट देऊन नूतन अध्यक्षांचे अभिनंदन व स्वागत करण्यात आले. बैठकीस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख आदी उपस्थित होते.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट फाऊंडेशन अध्यक्षपदी कुलगुरू डॉ. शिर्के

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ यांच्या अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या 'शिवाजी युनिव्हर्सिटी रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट फाऊंडेशन' कंपनी (सेक्शन-८)च्या अध्यक्षपदी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांची निवड करण्यात आली आहे. कंपनीच्या संचालक मंडळाची पहिली बैठक मंगळवारी विद्यापीठ कार्यालयात आयोजित करण्यात आली. बैठकीमध्ये कुलगुरू डॉ. शिर्के यांची अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व ग्रंथभेट देऊन नूतन अध्यक्षांचे अभिनंदन व स्वागत करण्यात आले. बैठकीस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. एम.एस. देशमुख आदी उपस्थित होते.

लोकसत्ता

# कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट फाउंडेशन'च्या अध्यक्षपदी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची निवड करण्यात आली असल्याचे बुधवारी सांगण्यात आले. शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ यांच्या अंतर्गत ही कंपनी स्थापन करण्यात आली असून कंपनीच्या संचालक मंडळाची पहिल्या बैठकीत ही एकमताने निवड करण्यात आली. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व ग्रंथभेट देऊन नूतन अध्यक्षांचे स्वागत करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख आदी उपस्थित होते.

25 NOV 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘नवोन्मेष’ हा विद्यापीठ समाजाशी जोडण्याचा उपक्रम

## कुलगुरू डॉ. शिर्के ; विद्यापीठात ‘इनोव्हेशन मीट’ कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

'नवोन्मेष' उपक्रमाला प्रोत्साहन हा विद्यापीठाला समाजाशी अधिक दृढपणे जोडण्याचा महत्त्वाचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

महाराष्ट्र राज्य नवोन्मेष संस्था, शिवाजी विद्यापीठ संशोधन व विकास फाउंडेशन (सेक्शन-८ कंपनी) व विद्यापीठाचे इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजिस केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'इनोव्हेशन मीट'च्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, तळागाळातील खेडोपाड्यातील सर्वसामान्य नागरिक, छोटे उद्योजक, व्यावसायिक आणि विद्यार्थी यांच्याकडे अनुभवातून किंवा कल्पनेमधील अनेक नवसंकल्पना असतात. सुप्त नवसंकल्पनांना मंच प्रदान करण्याच्या हेतूने विद्यापीठाने नवोन्मेषाला प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले आहे. अशा नवोन्मेषाला मंचावरच उपयुक्त पर्यावरण, सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे.



**कोल्हापूर : 'नवोन्मेष' परिषदेत बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. पी. डी. राऊत, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. एम. एस. देशमुख.**

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी मनोगतात प्राचीन काळापासून नवोन्मेष संशोधनाने मानवी जीवन कसे सुकर व सुखकर केल्याची उदाहरणे दिली. प्रास्ताविक इनोव्हेशन केंद्राचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले. पर्यावरण अधिविभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी सूत्रसंचालन केले. ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. पी. डी. राऊत यांनी आभार मानले.

इनोव्हेशन मीटसाठी समाजाच्या विविध घटकांकडून ऑनलाईन व ऑफलाईन स्वरुपात १३८ नवोन्मेष संकल्पनांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. या प्रस्तावांचे व्यवस्थापन, मॅकेनिकल व ऊर्जा, माहिती तंत्रज्ञान व संगणक, अन्न व प्रक्रिया, कृषी, पर्यावरण व पर्यटन आणि आरोग्य अशा सहा विभागांमध्ये वर्गीकरण करण्यात आले.

तरुण भारत

# 'नवोन्मेष'द्वारे विद्यापीठ समाजाशी जोडणार

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

सर्वसामान्यांच्या मनातील नवोन्मेष उपक्रमाला प्रोत्साहन हा विद्यापीठाला समाजाशी अधिक दृढपणे जोडण्याचा महत्त्वाचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले.

राज्य नवोन्मेष संस्था, शिवाजी विद्यापीठ संशोधन, विकास फौंडेशन (सेक्शन-८ कंपनी), इनोव्हेशन, इनक्युबेशन, लिंकेजिस केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'इनोव्हेशन मीट'चे आयोजन केले होते. तंत्रज्ञान सभागृहात या बैठकीचे उद्घाटन कुलगुरू शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यार्थ्यांच्या मनात अभ्यास, संशोधनाद्वारे अनेक कल्पना मूळ धरतात. त्यांना मूर्त रुप देण्यासाठी सहाय्य, मार्गदर्शन व सहकार्याची आवश्यकता असते. अशा सुप्त नवसंकल्पनांना व्यासपीठ उपलब्ध करण्यासाठी विद्यापीठाने नवोन्मेष उपक्रमाला प्रोत्साहनाचे धोरण स्वीकारले आहे. उपाय शोधणे म्हणजेच नवोन्मेषाची संधी असते, असे त्यांनी सांगितले.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, संशोधकांकडे मूलभूत संकल्पना,



सक्षमता, संयम असणे आवश्यक असते. नवनिर्मितीपासून शाश्वत विकासाकडे वाटचाल करावयाची आहे, याचे भान संशोधकांकडे असावे, असे सांगितले.

इनोव्हेशन केंद्राचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख यांनी स्वागत केले. पर्यावरण अधिविभाग प्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी सूत्रसंचालन केले. ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. पी. डी. राऊत यांनी आभार मानले.

**नवोन्मेष संकल्पनांचे १३८ प्रस्ताव**

नवोन्मेष संकल्पनांचे १३८ प्रस्ताव प्राप्त झाले. या प्रस्तावांचे व्यवस्थापन, मेकॅनिकल व ऊर्जा, माहिती तंत्रज्ञान व संगणक, अन्न व प्रक्रिया, कृषी, पर्यावरण व पर्यटन आणि आरोग्य अशा सहा विभागांमध्ये वर्गीकरण करण्यात येऊन दिवसभरात २७ विषय तज्ज्ञांसमोर त्यांचे गटनिहाय सादरीकरण केले.

24 NOV 2021

सकाळ

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘नवोन्मेष’ उपक्रम समाजाशी जोडणार

## कुलगुरू डॉ. शिर्के : शिवाजी विद्यापीठात ‘इनोव्हेशन मीट’चे उद्‌घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

टेंबलाईवाडी, ता. २३ : ‘‘नवोन्मेष उपक्रमाला प्रोत्साहन हा विद्यापीठाला समाजाशी अधिक दृढपणे जोडण्याचा प्रयत्न आहे,’’ असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

महाराष्ट्र राज्य नवोन्मेष संस्था, शिवाजी विद्यापीठ संशोधन व विकास फाउंडेशन (सेक्शन-८ कंपनी), विद्यापीठाचे इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजिस केंद्रातर्फे ‘इनोव्हेशन मीट’चे उद्‌घाटन झाले. तंत्रज्ञान अधिविभागाच्या सभागृहात कार्यक्रम झाला.

डॉ. शिर्के म्हणाले, ‘‘नागरिक, छोटे उद्योजक, व्यावसायिक, विद्यार्थ्यांकडे अनुभवातून किंवा कल्पनेमधील नवसंकल्पना असतात. अनेक सर्वसामान्य नागरिकांच्या मनातही काही अभिनव संकल्पना असतात. मात्र त्या मांडावयाच्या कोणाकडे आणि प्रत्यक्षात आणावयाच्या कशा, याविषयी त्यांच्या मनात संभ्रम असतो. विद्यार्थ्यांच्या मनातही त्यांच्या अभ्यासाद्वारे, संशोधनाद्वारे अनेक कल्पना मूळ धरतात. त्यांनाही मूर्तरूप देण्यासाठी साहाय्याची, शिक्षकांच्या मार्गदर्शन, सहकार्याची आवश्यकता असते. अशा सुप्त नवसंकल्पनांना मंच प्रदान करण्याच्या हेतूने विद्यापीठाने नवोन्मेषाला प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले आहे. या नवोन्मेष परिषदेत मांडल्या जाणाऱ्या प्रत्येक संकल्पनेवर ज्या त्या संकल्पकाची मालकी अबाधित राहील, याची दक्षता विद्यापीठ प्रशासन घेईल.’’

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, ‘‘आजकाल सर्वच कंपन्यांचे लक्ष विविध पेटंट्सकडे असते. त्यातील उपयुक्त पेटंटचा वापर ते व्यावसायिक उत्पादनासाठी करण्याची शक्यता असते. मात्र, त्यासाठी त्यांची खात्री पटावी लागते. म्हणून संशोधकांकडे मूलभूत संकल्पना, सक्षमता आणि संयम या गोष्टी असणे आवश्यक असते.’’

इनोव्हेशन केंद्राचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख यांनी स्वागत केले. पर्यावरण अधिविभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पी. डी. राऊत यांनी आभार मानले.



**शिवाजी विद्यापीठात आयोजित इनोव्हेशन मीटमध्ये बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.**

### नवोन्मेष संकल्पनांचे प्रस्ताव

दरम्यान, इनोव्हेशन मीटसाठी समाजाच्या विविध घटकांकडून ऑनलाईन व ऑफलाईन स्वरुपात १३८ नवोन्मेष संकल्पनांचे प्रस्ताव प्राप्त झाले. या प्रस्तावांचे व्यवस्थापन, मॅकेनिकल व ऊर्जा, माहिती तंत्रज्ञान व संगणक, अन्न व प्रक्रिया, कृषी, पर्यावरण व पर्यटन आणि आरोग्य अशा सहा विभागांमध्ये वर्गीकरण करण्यात येऊन दिवसभरात २७ विषयतज्ज्ञांसमोर त्यांचे गटनिहाय सादरीकरण केले.

24 NOV 2021 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'नवोन्मेष' समाजाशी दृढपणे जोडण्याचा उपक्रम

## कुलगुरू डॉ. शिर्के : शिवाजी विद्यापीठात 'इनोव्हेशन मीट' उत्साहात

कोल्हापूर : प्रतिनिधी

नवोन्मेष उपक्रमाला प्रोत्साहन हा विद्यापीठाला समाजाशी अधिक दृढपणे जोडण्याचा महत्त्वाचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. महाराष्ट्र राज्य नवोन्मेष संस्था, शिवाजी विद्यापीठ संशोधन व विकास फाऊंडेशन (सेक्शन-८ कंपनी) आणि विद्यापीठाचे इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजिस केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'इनोव्हेशन मीट'च्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. तंत्रज्ञान अधिविभागाच्या सभागृहात हा कार्यक्रम झाला.




कोल्हापूर : नवोन्मेष परिषदेत बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. व्यासपीठावर डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. एम. एस. देशमुख.

डॉ. शिर्के म्हणाले, सुप्त नवसंकल्पनांना मंच देण्याच्या हेतूने विद्यापीठाने नवोन्मेषाला प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले आहे.

डॉ. पाटील म्हणाले, नवनिर्मितीपासून शाश्वत विकासाकडे आपल्याला वाटचाल करावयाची आहे, याचे भान संशोधकांकडे असावे. त्याचप्रमाणे मांडल्या जाणाऱ्या नवसंकल्पना प्रत्यक्षात आणल्या जातील, अशा स्वरूपाच्या असाव्यात.

स्वागत व प्रास्ताविक इनोव्हेशन केंद्राचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले. डॉ. आसावरी जाधव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पी. डी. राऊत यांनी आभार मानले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात 'इनोव्हेशन मीट' उत्साहात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नवोन्मेष उपक्रमाला प्रोत्साहन हा विद्यापीठाला समाजाशी अधिक दृढपणे जोडण्याचा महत्त्वाचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. महाराष्ट्र राज्य नवोन्मेष संस्था, शिवाजी विद्यापीठ संशोधन व विकास फाऊंडेशन, इनक्युबेशन व लिंकेजिस केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'इनोव्हेशन मीट'च्या उद्‌घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, सर्वसामान्य नागरिक, छोटे उद्योजक, व्यावसायिक आणि विद्यार्थी यांच्याकडे अनेक नवसंकल्पना असत [illegible] कशा प्रत्यक्षात आणायच्या याबाबत संभ्रम असतो. सुप्त नवसंकल्पनांना व्यासपीठ देण्याच्या हेतूने विद्यापीठाने नवोन्मेषाला प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले आहे. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक इनोव्हेशन केंद्राचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले. पर्यावरण अधिविभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पी. डी. राऊत यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात मंथली इनोव्हेशन चॅलेंजचे आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राच्या माध्यमातून मंथली इनोव्हेशन चॅलेंज या उपक्रमाची निर्मिती करण्यात आली असून, त्याद्वारे विद्यार्थी, संशोधक, नागरिकांना उद्‌भवणाऱ्या विविध समस्यांवर नावीन्यपूर्ण उत्तरे व समाधान सुचवण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी दिली आहे. यासंदर्भातील सर्व माहिती विद्यापीठाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

या उपक्रमांतर्गत दर महिन्याला एक विषय दिला जाईल. यावर विद्यार्थी, शिक्षक, तसेच नागरिक त्या संदर्भातील त्यांनी शोधलेले प्रश्न, त्यावर शोधलेला कल्पक पर्याय अथवा उत्तर, समाधान यांची माहिती भरू शकतात. यामुळे परिस्थितीकडे पाहण्याचा नवदृष्टिकोन विकसित होण्यास नक्कीच मदत होईल. या प्रक्रियेतून विद्यार्थ्यांना स्टार्टअप स्थापन करणे व त्याद्वारे तंत्रज्ञानाचे समाज हिताकरिता प्रभावी हस्तांतरण करणे सोपे होणार आहे, असे मत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले आहे

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज'

## शेतीसंदर्भातील अवजारे, प्रक्रिया, उत्पादने याबाबत समस्या, उपायांची माहिती पाठविण्याचे आवाहन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्रातर्फे कृतिशील व नवसंकल्पनांना मूर्त रूप देण्याची आवड असणाऱ्या विद्यार्थी, संशोधक व नागरिकांना रोजच्या आयुष्यात उद्भवणाऱ्या विविध समस्यांवर नावीन्यपूर्ण उत्तरे व समाधान सूचविण्याची संधी 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज' या माध्यमातून उपलब्ध होणार आहे.

उपक्रमांतर्गत दर महिन्याला एक विषय दिला जाईल. यावर विद्यार्थी शिक्षक, नागरिक त्या संदर्भातील त्यांनी शोधलेले प्रश्न व त्यावर शोधलेला कल्पक पर्याय अथवा उत्तर, समाधान याची माहिती भरू शकतात. याकरिता गुगल फॉर्मच्या माध्यमातून एक लिंक तयार केली आहे. ही लिंक विद्यापीठाच्या वेबसाईटवर उपलब्ध करून दिली आहे.

'Home Page → News & Events → 'Monthly Innovation Challenge-December 2021' असा त्याचा मार्ग आहे. उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांत नवसंशोधन व कृतिशील समस्या समाधान या बाबींना चालना मिळणार आहे.

या महिन्यातील उपक्रमाकरिता जिज्ञासूंना 'शेती संदर्भातील अवजारे, प्रक्रिया, उत्पादने' हे क्षेत्र दिलेले आहे. शेती व त्या संदर्भातील



शिवाजी विद्यापीठ

विविध उपक्रमांमध्ये शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या व त्यावरील कल्पक उत्तरे अपेक्षित आहेत. यातील सहभागींना या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींसमोर सादरीकरणाची संधी मिळणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी दिली.

> “
> सतत बदलणाऱ्या स्पर्धात्मक परिस्थितीमध्ये मूलभूत प्रश्न शोधून त्यावर प्रभावी उत्तरे व आर्थिकदृष्ट्या सक्षम पर्यायांची निर्मिती करणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांच्या कल्पक विचारांना 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज'च्या माध्यमातून चालना मिळणार आहे. समस्या आणि परिस्थितीकडे पाहण्याचा नवदृष्टिकोन विकसित होण्यास नक्कीच मदत होईल.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के,**
> कुलगुरू

# विद्यापीठातर्फे दिव्यांगांसाठी 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज'

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे दिव्यांगांसाठी मंथली इनोव्हेशन चॅलेंज संकल्पना राबविण्यात येत आहे. याअंतर्गत जानेवारी-२०२२ मध्ये 'दिव्यांगांच्या प्रकारामधील व्यक्तींपुढील आव्हाने हाताळणे' हा विषय आहे. विद्यापीठ सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड लिंकेज व एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशनच्या माध्यमातून विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक व समाजातील प्रत्येक संवेदनशील, उत्साही व सर्जनशील वैयक्तिक भागधारकांना समाजातील विविध प्रश्नांवर उपाय शोधण्याकरिता व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. या अनुषंगाने दिव्यांग व्यक्तींपुढील आव्हाने, विद्यमान समस्यांवर त्यांचे सर्जनशील, नावीन्यपूर्ण व आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य उपाय देण्यात यावेत. सहभागींनी संबंधित क्षेत्रातील दैनंदिन जीवनातील समस्या ओळखणे अपेक्षित आहे. त्यांचे नावीन्यपूर्ण उपाय प्रस्तावित करण्यासाठी आमंत्रित करण्यात येत आहे. याकरिता गुगल फॉर्मच्या माध्यमातून एक लिंक तयार केली आहे. ही लिंक विद्यापीठाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे, अशी माहिती केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी दिली.

पुढारी

यांनी कळवले आहे.

# नवीन स्टार्टअप नोंदणीचे आवाहन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, संशोधन व सहचर्य केंद्राच्या अंतर्गत 'एस.यू.के. रिसर्च डेव्हलपमेंट फाऊंडेशन ही सेक्शन ८ कंपनी स्थापन करण्यात आली आहे. नवीन स्टार्ट अपसाठी कंपन्यांनी नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

केंद्रास महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी या राज्य सरकारच्या उपक्रमाचे सहकार्य लाभले आहे. केंद्रामार्फत विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यात नवीन स्टार्टअप सुरू झाले आहेत. ज्यांनी 'डीआयपीपी'ची नोंदणी केलेल्या अधिकृत कंपन्यांनी विद्यापीठाच्या इन्क्युबेशन केंद्राशी संपर्क साधावा, असे केंद्राचे संचालक प्रा.डॉ.एम.एस.देशमुख यांनी कळवले आहे.

My Kolhapur Edition
Jan 7, 2022 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

# दिव्यांगांच्या क्षमता वृद्धिंगत करण्यास मदत

कोल्हापूर, ता. २७ : दिव्यांगांच्या नवनिर्मितीला, क्षमतांना वृद्धिंगत करण्यास शिवाजी विद्यापीठाचे कायम सहकार्य राहील, अशी ग्वाही प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी दिली. शिवाजी विद्यापीठातर्फे दिव्यांगांच्या नवकल्पना प्रकल्प सादरीकरण कार्यशाळेत ते बोलत होते. हेल्पर्स संस्थेच्या समर्थ विद्यालयात त्याचे आयोजन केले.

याप्रसंगी हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप्ड संस्थेचे जनरल मॅनेजर संतोष पंडित, विश्वस्त रेखाताई देसाई यांनी विविध विभागांची माहिती दिली. हर्षवर्धन पंडित यांनी सूत्रसंचालन केले. नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राचे प्र-संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी प्रास्ताविक केले. डॉ. पी. डी. राऊत यांनी आभार मानले.

## सकाळ कनेक्ट

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या ३० टक्के विद्यार्थिनींचा 'स्टार्टअप'मध्ये झेंडा

## एकीला जैविक खताचे पेटंट, तर दुसरीच्या 'डी-कॅफे' नवसंकल्पनेला बळ


सुप्रिया कुसाळे


मुग्धा सावंत

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन केंद्रामार्फत नवसंकल्पनांना पाठबळ दिले जात आहे. यातून नवनिर्मितीच्या कल्पना मोठ्या प्रमाणात पुढे येत आहेत. स्टार्टअपमध्ये विद्यार्थिनींचे प्रमाण ३० टक्के आहे. फूड सायन्सची विद्यार्थिनी सुप्रिया कुसाळेला जैविक खताचे पेटंट, तर पीएच.डी. संशोधक मुग्धा सावंतच्या 'डी-कॅफे' नवसंकल्पनेला बळ मिळाले आहे.

जागतिक महिला दिन विशेष

सध्या सर्वच स्तरांवर नवोपक्रम, नवनिर्मिती व स्टार्टअपची चर्चा सुरू आहे. शिवाजी विद्यापीठात २ लाख ५० हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यामध्ये ५० टक्के विद्यार्थिनी आहेत. २०१६ साली महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ **पान २ वर ▸**

Kolhapur Edition
Mar 8, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या ३० टक्के विद्यार्थिनींचा 'स्टार्टअप'मध्ये झेंडा

(पान १ वरून) कायद्याची अंमलबजावणी झाली. कायद्यांतर्गत विद्यापीठात नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्र स्थापन झाले आहे. केंद्रांतर्गत सेक्शन ८ कंपनी सुरू झाली आहे. कंपनीमार्फत विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या नव संकल्पनांना मूर्त स्वरूप देण्याचे काम सुरू आहे. कंपनीने विविध उपक्रमांची सुरुवात केली असून, त्यामध्ये मुलींचा टक्का दिवसेंदिवस वाढत आहे. राज्य शासनाच्या महाराष्ट्र इनोव्हेशन सोसायटीमार्फत सर्व विद्यापीठांना भरघोस अनुदान दिले जात आहे.

विद्यापीठाने नोव्हेंबरपासून आजपर्यंत नवसंकल्पना मांडणीसाठी विविध स्पर्धा घेतल्या आहेत. यात २०१ विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण संकल्पनांचा समावेश होता. या संकल्पनांमधून ७ नवसंकल्पना स्टार्टअप म्हणून पुढे घेऊन जाण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. यात ३० टक्के विद्यार्थिनींचे प्रमाण आहे. विद्यापीठामार्फत 'स्टार्टअप सूत्रा' नावाची व्याख्यानमाला सुरू केली आहे. यात ५० टक्के मुली व महिला सहभागी झाल्याचे दिसून आले आहे. केंद्रामार्फत दोन विद्यार्थिनींनी सादर केलेल्या नवसंकल्पनांना विद्यापीठाने स्टार्टअप म्हणून मान्यता दिली आहे.

भारत सरकारच्या स्टार्टअप इंडिया व राज्य सरकारच्या उपक्रमाच्या माध्यमातून दक्षिण महाराष्ट्रातील नावीन्यपूर्ण संकल्पनांना चालना व शाश्वत विकासासाठी प्रयत्न केले जात आहेत. महिला सक्षमीकरणाच्या अनुषंगाने जास्तीत जास्त विद्यार्थिनी व महिलांचा सहभाग वाढविण्याचा मानस आहे.

- **डॉ. एम. एस. देशमुख,** प्रभारी संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्र, शिवाजी विद्यापीठ

## 'डी-कॅफे' कॉफीस पर्याय; पेटंटसाठी अर्ज

फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागातील मुग्धा सावंत या विद्यार्थिनीने स्टार्टअपअंतर्गत 'डी-कॅफे' हे पेय कॉफीस पर्याय म्हणून तयार केले आहे. यात कॉफीचा अंश नसून, यात कॉफीचा स्वाद आहे. कॉफीच्या बिया न वापरता त्याच्यामध्ये स्वाद आणि चव विकसित केली आहे. यातून जास्त प्रमाणात प्रोटिन व कॅल्शियम मिळतात. याचा लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना फायदा होऊ शकतो. उच्च रक्तदाब, गरोदर स्त्रिया, थायरॉईड या आजारांतील लोकांना जास्त कॅफीन असलेल्या पदार्थांचे सेवन घातक ठरू शकते. पेटंटसाठी विद्यार्थिनीने अर्ज केला आहे.

## शेतकऱ्यांच्या खर्चात कपात होणार, उत्पादन वाढणार

सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील सुप्रिया कुसाळे या विद्यार्थिनीने सेंद्रिय खतावर नावीन्यपूर्ण संशोधन करून जैविक खत तयार केले आहे. त्यामध्ये मातीतील नत्र, फॉस्फरस व पोटॅशियम घेण्याची सुविधा केली आहे. या जैविक खतामध्ये 'फायटेज'चा उपयोग केल्याने जमिनीतील नत्र, स्फुरद व पलाश यांचे प्रमाण वाढल्याने पिकाचे उत्पादन वाढते. ऊस, फळभाजा, पालेभाज्या यांच्या वाढीसाठी हे जैविक खत उपयोगी ठरत आहे. जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते. शेतकऱ्यांच्या खर्चात कपात होऊन उत्पादनात वाढ होते. यासाठीचे पेटंट भारत सरकारकडून मिळाले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 8 MAR 2022

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या ३० टक्के विद्यार्थिनींचा 'स्टार्टअप'मध्ये झेंडा

## एकीला जैविक खताचे पेटंट, तर दुसरीच्या 'डी-कॅफे' नवसंकल्पनेला बळ


सुप्रिया कुसाळे


मुग्धा सावंत

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन केंद्रामार्फत नवसंकल्पनांना पाठबळ दिले जात आहे. यातून नवनिर्मितीच्या कल्पना मोठ्या प्रमाणात पुढे येत आहेत. स्टार्टअपमध्ये विद्यार्थिनींचे प्रमाण ३० टक्के आहे. फूड सायन्सची विद्यार्थिनी सुप्रिया कुसाळेला जैविक खताचे पेटंट, तर पीएच.डी. संशोधक मुग्धा सावंतच्या 'डी-कॅफे' नवसंकल्पनेला बळ मिळाले आहे.

जागतिक महिला दिन विशेष

सध्या सर्वच स्तरांवर नवोपक्रम, नवनिर्मिती व स्टार्टअपची चर्चा सुरू आहे. शिवाजी विद्यापीठात २ लाख ५० हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यामध्ये ५० टक्के विद्यार्थिनी आहेत. २०१६ साली महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ **पान २ वर ▸**

# शिवाजी विद्यापीठाच्या ३० टक्के विद्यार्थिनींचा 'स्टार्टअप'मध्ये झेंडा

(पान १ वरून) कायद्याची अंमलबजावणी झाली. कायद्यांतर्गत विद्यापीठात नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्र स्थापन झाले आहे. केंद्रांतर्गत सेक्शन ८ कंपनी सुरू झाली आहे. कंपनीमार्फत विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या नव संकल्पनांना मूर्त स्वरूप देण्याचे काम सुरू आहे. कंपनीने विविध उपक्रमांची सुरुवात केली असून, त्यामध्ये मुलींचा टक्का दिवसेंदिवस वाढत आहे. राज्य शासनाच्या महाराष्ट्र इनोव्हेशन सोसायटीमार्फत सर्व विद्यापीठांना भरघोस अनुदान दिले जात आहे.

विद्यापीठाने नोव्हेंबरपासून आजपर्यंत नवसंकल्पना मांडणीसाठी विविध स्पर्धा घेतल्या आहेत. यात २०१ विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण संकल्पनांचा समावेश होता. या संकल्पनांमधून ७ नवसंकल्पना स्टार्टअप म्हणून पुढे घेऊन जाण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. यात ३० टक्के विद्यार्थिनींचे प्रमाण आहे. विद्यापीठामार्फत 'स्टार्टअप सूत्रा' नावाची व्याख्यानमाला सुरू केली आहे. यात ५० टक्के मुली व महिला सहभागी झाल्याचे दिसून आले आहे. केंद्रामार्फत दोन विद्यार्थिनींनी सादर केलेल्या नवसंकल्पनांना विद्यापीठाने स्टार्टअप म्हणून मान्यता दिली आहे.

> भारत सरकारच्या स्टार्टअप इंडिया व राज्य सरकारच्या उपक्रमाच्या माध्यमातून दक्षिण महाराष्ट्रातील नावीन्यपूर्ण संकल्पनांना चालना व शाश्वत विकासासाठी प्रयत्न केले जात आहेत. महिला सक्षमीकरणाच्या अनुषंगाने जास्तीत जास्त विद्यार्थिनी व महिलांचा सहभाग वाढविण्याचा मानस आहे.
>
> - **डॉ. एम. एस. देशमुख,** प्रभारी संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्र, शिवाजी विद्यापीठ

### 'डी-कॅफे' कॉफीस पर्याय; पेटंटसाठी अर्ज

फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागातील मुग्धा सावंत या विद्यार्थिनीने स्टार्टअपअंतर्गत 'डी-कॅफे' हे पेय कॉफीस पर्याय म्हणून तयार केले आहे. यात कॉफीचा अंश नसून, यात कॉफीचा स्वाद आहे. कॉफीच्या बिया न वापरता त्याच्यामध्ये स्वाद आणि चव विकसित केली आहे. यातून जास्त प्रमाणात प्रोटिन व कॅल्शियम मिळतात. याचा लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना फायदा होऊ शकतो. उच्च रक्तदाब, गरोदर स्त्रिया, थायरॉईड या आजारांतील लोकांना जास्त कॅफीन असलेल्या पदार्थांचे सेवन घातक ठरू शकते. पेटंटसाठी विद्यार्थिनीने अर्ज केला आहे.

### शेतकऱ्यांच्या खर्चात कपात होणार, उत्पादन वाढणार

सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील सुप्रिया कुसाळे या विद्यार्थिनीने सेंद्रिय खतावर नावीन्यपूर्ण संशोधन करून जैविक खत तयार केले आहे. त्यामध्ये मातीतील नत्र, फॉस्फरस व पोटॅशियम घेण्याची सुविधा केली आहे. या जैविक खतामध्ये 'फायटेज'चा उपयोग केल्याने जमिनीतील नत्र, स्फुरद व पलाश यांचे प्रमाण वाढल्याने पिकाचे उत्पादन वाढते. ऊस, फळभाजा, पालेभाज्या यांच्या वाढीसाठी हे जैविक खत उपयोगी ठरत आहे. जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते. शेतकऱ्यांच्या खर्चात कपात होऊन उत्पादनात वाढ होते. यासाठीचे पेटंट भारत सरकारकडून मिळाले आहे.

पुढारी

# संशोधन-शाश्वत प्रगती यातूनच समाज विकास

## प्रतिमा किर्लोस्कर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

यशस्वी उद्योजक होण्याकरिता संशोधन वृत्ती जोपासून आपल्या सभोवतालच्या समस्या ओळखून त्यावर प्रभावी कल्पनापूर्ण उत्तरे शोधली पाहिजेत, असे प्रतिपादन किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड (केबीएल) पुणे इनोवेशन (सोसायटी)च्या अध्यक्षा श्रीमती प्रतिमा किर्लोस्कर यांनी केले.

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठात आयोजित स्टार्टअप सूत्र या ऑनलाईन व्याख्यानमालेमध्ये त्यांचे 'इनोव्हेशन व उद्योजकता याकरिता महिलांचे सबलीकरण' या विषयावर त्या बोलत होत्या. किर्लोस्कर उद्योग समूहाच्या ऑल लेडीज प्लांट विषयी माहिती देताना प्रतिमा किर्लोस्कर म्हणाल्या, उद्योगक्षेत्रात महिलांना विविध संधी उपलब्ध असून त्याकरता काम करण्याची आपली तयारी असली पाहिजे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, समस्या शोध ही इनोव्हेशनकरिता अतिशय महत्त्वाची आहे. याकरिता विविध घटकांशी संवाद साधणे गरजेचे आहेत. योग्य मानसिकता व योग्य दृष्टिकोन असेल तर नवसंशोधनासाठी सहकार्य नक्कीच मिळते. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक प्रा. पी. डी. राऊत यांनी केले. सूत्रसंचालन हर्षवर्धन पंडित यांनी केले.

# समस्या ओळखून प्रभावी कल्पनापूर्ण उत्तरे शोधावीत : प्रतिमा किर्लोस्कर

## शिवाजी विद्यापीठात 'स्टार्टअप सूत्र' अंतर्गत व्याख्यान



कोल्हापूर, ता. १४ : 'यशस्वी उद्योजक होण्यसाठी इनोव्हेटिव्ह असावे. जाणीवपूर्वक निरीक्षणाने सभोवताली असणाऱ्या समस्या ओळखून प्रभावी कल्पनापूर्ण उत्तरे शोधावीत,' असे मत किर्लोस्कर ब्रदर्स पुणे इनोव्हेशनच्या (सोसायटी) अध्यक्षा प्रतिमा किर्लोस्कर यांनी व्यक्त केले.

### इनोव्हेशन चॅलेंजचे आयोजन

किर्लोस्कर समूह, शिवाजी विद्यापीठातर्फे लवकरच एका इनोव्हेशन चॅलेंजचे आयोजन केले जाईल. याकरिता एक विशिष्ट प्रश्न देऊन त्यावर उत्तरे शोधण्याकरिता विद्यार्थी प्राध्यापक, संशोधकांना निमंत्रित करून त्यांना सादरीकरणाची संधी दिली जाईल. प्रभावी समस्या समाधानास योग्य बक्षीस देऊन गौरविले जाईल, असे किर्लोस्कर यांनी जाहीर केले. याबाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर केली जाईल.

विद्यापीठात आयोजित 'स्टार्टअप सूत्र' ऑनलाईन व्याख्यानमालेत त्यांचे 'इनोव्हेशन व उद्योजकता याकरिता महिलांचे सबलीकरण' यावर बीजभाषण झाले. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

किर्लोस्कर म्हणाल्या, 'ऑनलाइन प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून इनोव्हेशनची माहिती मिळवता येऊ शकते. शिक्षणक्षेत्राबरोबर वित्त, आरोग्य, दळणवळण क्षेत्रांत स्टार्टअप्स सुरू करता येऊ शकतात. इनोव्हेशनला सीमा नाही. स्टार्टअप्सकरिता ग्लोबल-स्केलेबल-डिलिव्हरेबल असते. यशस्वी होण्याकरिता जोखीम पत्करणे, योग्य वेळी कृती करणे महत्त्वाचे आहे.'

डॉ. शिर्के म्हणाले, 'समस्या शोध ही इनोव्हेशनकरिता महत्त्वाची आहे. याकरिता विविध घटकांशी संवाद साधणे गरजेचे आहे.' प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते. याचनीत पुष्करणा यांनी इनोव्हेशन २.० यावर सादरीकरण केले. नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी स्वागत केले. एसयुके रिसर्च अँड डेव्हलपमेन्ट सेंटरचे सीईओ प्रा. डॉ. पी. डी. राऊत यांनी परिचय करून दिला. हर्षवर्धन पंडित यांनी सूत्रसंचालन केले.

10 APR 2022 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विविध आव्हानांवर मात करण्यासाठी नवोपक्रमाशिवाय पर्याय नाही

## डॉ. जी. डी. यादव यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सध्या मानवजातीपुढे इंधन दरवाढीसह ग्लोबल वॉर्मिंगसारखी अनेक नैसर्गिक, मानवनिर्मित आव्हाने उभी आहेत. त्यावर उपाययोजना करावयाच्या, तर नवसंशोधन व नवोपक्रमास चालना देण्याखेरीज पर्याय नाही, असे प्रतिपादन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जी. डी. यादव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड लिंकेजिस, एसयूके संशोधन व विकास फाऊंडेशन (सेक्शन-८ कंपनी) व सांगली येथील सिस्टेड फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्टार्ट-अप सूत्रा' या मालिकेंतर्गत आयोजित 'नवोपक्रमातून राष्ट्रबांधणी' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. डॉ. यादव म्हणाले, भविष्यात पदवी मिळाल्यानंतर नोकरी मागण्याऐवजी नोकऱ्यांची निर्मिती करण्याचे ध्येय प्रत्येक विद्यार्थ्याने बाळगले पाहिजे. आयुष्यात यशस्वी व्हावयाचे असल्यास स्वतःची भाषा उत्तम व्याकरणासह आली तरच अन्य भाषाही उत्तम पद्धतीने येतील. विद्यापीठे ही तर नवसंशोधन आणि नवोपक्रमाची महत्त्वाची केंद्रे आहेत. त्यांनी विद्यार्थी केंद्रित अभ्यासक्रम सुरू केले पाहिजेत. त्याचप्रमाणे नवसंशोधन व नवोपक्रमास चालना देत राहायला हवे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांनी अपयशाची भीती न बाळगता नवसंकल्पना व नवसंशोधनाचे उपक्रम हाती घेत राहण्याची आवश्यकता आहे. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सिस्टेड फाऊंडेशनचे प्रा. भालबा केळकर व डॉ. सुहास खांबे यांनी लिहिलेल्या 'नवशोधन : मंत्र आणि तंत्र' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. केंद्राचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख यांनी प्रास्ताविक केले. सेक्शन-८ कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी. डी. राऊत यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. अभियंता हर्षवर्धन पंडित यांनी प्रकाशित पुस्तकाविषयी माहिती दिली. उद्योजक अरविंद देशपांडे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
21 APR 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# व्यवसायासाठी नाविन्यपूर्ण कौशल्याची गरज

## कृष्णा गावडे यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात कौशल्य विकास अंतर्गत कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

नोकरी आणि व्यवसाय करण्यासाठी नाविण्यपूर्ण कौशल्य आवश्यक आहे. त्याचबरोबर गायन, वादन, लेखन, नृत्य, वक्तृत्व, चित्रकला, छायाचित्रण यांसारख्या कौशल्यामुळे ताण-तणाव कमी होतो, असे प्रतिपादन किर्लोस्कर कंपनीचे माजी सह उपाध्यक्ष कृष्णा गावडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, शिवाजी विद्यापीठ संशोधन व विकास फौंडेशन यांचे संयुक्त विद्यमाने 'आझादी का अमृत महोत्सव" अंतर्गत विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये आयोजित 'कौशल्य व उद्योजकता विकास कार्यशाळेचे" आयोजन केले होते. याप्रसंगी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील अध्यक्षस्थानी होते.

कृष्णा गावडे म्हणाले, जगामध्ये खुप वेगाने तांत्रिक बदल होत आहेत. बदलते तंत्रज्ञान आत्मसात करणे हे विद्यार्थी आणि उद्योजगाकांसाठी गरजेचे आहे. तांत्रिकदृष्या झपाट्याने बदलत चाललेल्या जगामध्ये टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वत:मध्ये सातत्यपूर्ण बदल घडवत राहणे काळाची गरज आहे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, बदलत्या जागाप्रमाणे तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे. स्पर्धेच्या जगामध्ये टिकण्यासाठी शिक्षण आणि अध्यापन पध्दतीमध्ये विद्यार्थी आणि शिक्षकांनी नाविण्यपूर्ण बदल करावे. सर्जनशीलता, संवाद कौशल्ये वाढण्यासाठी योग्य ते प्रयत्न केले पाहिजेत. विद्यापीठाकडून विविध प्रकारचे १३४ कौशल्य देण्याचे प्रयत्न केले जात आहेत त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये कौशल्यांचा आंतरभाव केलेला आहे. कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. महेश चव्हाण यांनी सूत्रसंचालन व आभारमानले. यावेळी डॉ. पी. डी. राऊत, डॉ. व्ही. एस. खंडागळे, डॉ. के. बी. पाटील, संलग्नित महाविद्यालयातील कौशल्य प्रशिक्षक, विद्यार्थी, उपस्थित होते.

सकाळ

# नोकरी, उद्योगासाठी नावीन्यपूर्ण कौशल्य आवश्यक : गावडे

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १९ : नोकरी मिळविण्यासाठी व उद्योग उभारण्यासाठी नावीन्यपूर्ण कौशल्य आवश्यक आहे, असे किर्लोस्कर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे माजी सह उपाध्यक्ष कृष्णा गावडे यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, शिवाजी विद्यापीठ संशोधन व विकास फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने 'आझादी का अमृत महोत्सव'अंतर्गत आयोजित 'कौशल्य व उद्योजकता विकास कार्यशाळे'चे आयोजन केले होते. त्यावेळी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील हे अध्यक्षस्थानी होते. मानव्यशास्त्र सभागृहात कार्यक्रम झाला. गावडे म्हणाले, 'आजच्या नोकरी, व्यवसाय व उद्योगधंद्यामध्ये पुढील दहा वर्षांमध्ये अमूलाग्र बदल झालेला दिसून येईल. त्यासाठी भविष्यकाळ ओळखून आताच्या पिढीने आवश्यक कौशल्य गुण अंगीकारणे महत्वाचे आहे. ज्या क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांना आनंद आणि समाधान मिळतो त्या क्षेत्राची निवड करावी.'

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, 'जग ज्याप्रमाणे बदलत आहे, त्याप्रमाणे आपले ज्ञान बदलणे आवश्यक आहे. स्पर्धेच्या जगामध्ये टिकण्यासाठी शिक्षण



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कौशल्य व उद्योजकता विकास कार्यशाळेत बोलताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील.**

आणि अध्यापन पद्धतीमध्ये विद्यार्थी आणि शिक्षकांनी नावीन्यपूर्ण बदल, सर्जनशीलता, संवाद कौशल्ये वाढण्यासाठी योग्य ते प्रयत्न केले पाहिजेत. कौशल्याशिवाय भविष्यामध्ये संधी मिळणे अशक्य आहे. दृष्टी आणि दृष्टीकोन बदललात तर जग बदलेल. घरातील आणि उद्योग व्यवसायातील समस्या सोडविण्यासाठी विद्यार्थी आणि उद्योजकांनी अतिसूक्ष्म विचार करणे गरजेचे आहे.''

डॉ. पी. डी. राऊत, डॉ. खंडागळे, डॉ. के. बी. पाटील उपस्थित होते. कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. महेश चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले.

लोकमत



छत्रपती शाहू मिलमध्ये लोकराजा राजर्षी शाहू कृतज्ञता पर्वामध्ये आयोजित करण्यात आलेल्या स्टार्टअप इनोव्हेशन फेस्टिव्हलमध्ये उत्कृष्ट उत्पादनासाठी सादरकर्त्यांना जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

# 'स्टार्टअप इनोव्हेशन' फेस्टिव्हलमध्ये खाडे, कुंभोजकर, चौगले यांची बाजी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** लोकराजा राजर्षी शाहू कृतज्ञता पर्व अंतर्गत छत्रपती शाहू मिलमध्ये झालेल्या 'स्टार्टअप-इनोव्हेशन' फेस्टिव्हलमध्ये उत्कृष्ट उत्पादनाकरिता विश्वजित खाडे, नितीन कुंभोजकर, धवल चौगुले आणि महिलांमध्ये सागरिका पटवर्धन यांच्या इनोव्हेशनची निवड करण्यात आली.

या फेस्टिव्हलचे नियोजन जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर, महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी, शिवाजी विद्यापीठ आणि सिबीक बिझनेस इन्क्युबेटर यांनी केले होते.

या उपक्रमात विश्वजित खाडे ( आरएनटी रोबोटिक्स) यांना प्रथम क्रमांकाचे प्रमाणपत्र, रोख एक लाख रूपये, तर नितीन कुंभोजकर (सक्रुत हार्वेस्टर) यांना द्वितीय क्रमांकाचे प्रमाणपत्र व रोख ७५ हजार आणि धवल चौगुले (नोकरी महामंडळ) यांना तृतीय क्रमांकाचे प्रमाणपत्र व ५० हजार रुपये देऊन जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, चंद्रशेखर डोली, एम.वाय.पेंडसे, आदी उपस्थित होते.

लोकमत

# कोल्हापुरात ‘स्टार्टअप’पेक्षा ‘स्टँड-अप इंडिया’ आघाडीवर

## गेल्या सहा वर्षांत ५४७ प्रस्ताव मंजूर : विविध १०० ‘स्टार्टअप’ची नोंदणी

**संतोष मिठारी**
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** उद्योगाला चालना देऊन रोजगार निर्मिती वाढविण्यासाठी केंद्र सरकारने स्टार्टअप आणि स्टँड-अप इंडिया योजनांची सुरुवात करून पाऊले टाकली. ‘फौंड्री हब’ असलेल्या कोल्हापूर जिल्ह्यात स्टार्टअपच्या तुलनेत स्टँडअप इंडिया योजना आघाडीवर आहे. गेल्या सहा वर्षांत एकूण ५४७ प्रकरणांसाठी बँकांनी कर्ज मंजूर केले आहेत. कोल्हापुरातून मागील तीन वर्षात विविध १०० स्टार्टअपची नोंदणी झाली आहे.

केंद्र सरकारने २०१६ मध्ये स्टँड-अप इंडिया ही योजना महिला आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती समुदायातील उद्योजकतेला पाठिंबा देण्यासाठी सुरू केली. याअंतर्गत विविध क्षेत्रातील उद्योग सुरू करण्यासाठी कोल्हापुरातील ५४७ प्रकरणे मंजूर झाली आहेत. त्यांना बँकांच्या माध्यमातून १३३ कोटी ३४ लाखांचे कर्ज वितरित केले आहे.

### गेल्या तीन वर्षापासून गती वाढली...



स्टार्टअप इंडिया योजना २०१६ मध्ये सुरु झाली; मात्र कोल्हापूर जिल्ह्यात स्टार्टअपची गती गेल्या तीन वर्षापासून वाढली. केंद्र सरकारच्या स्टार्टअप इंडिया पोर्टलवर कोल्हापूरमधील १०० स्टार्टअपची नोंदणी झाली आहे. त्यातील ३० स्टार्टअप हे नवसंशोधनाशी संबंधित आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या एसयुके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फौंडेशनच्या मार्गदर्शनाखाली ६, तर सिदम इनोव्हेशन अँड बिझनेस इन्क्युबेशन सेंटरच्या मार्गदर्शनाखाली १८ स्टार्टअप सुरु आहेत.



विद्यार्थी, शिक्षक, युवा वर्गाने स्टार्टअप, स्टँड-अप इंडियाद्वारे उद्योग उभारणी केली आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर देशातील स्टार्टअप कंपन्या आर्थिक अडचणीत आल्याचे चित्र असताना कोल्हापूरमधील स्टँड-अप, स्टार्टअपची स्थिती चांगली दिसत आहे.



**या क्षेत्रातील स्टार्टअप**

उद्योग, कृषी, शैक्षणिक, हेल्थकेअर, फूड इंडस्ट्री, आदी क्षेत्रातील स्टार्टअप आहेत. कोरोना काळात व्हेंटिलेटर, ऑक्सिजन पुरवठा, बेड, आदी वैद्यकीय साधनांचे स्टार्टअप जिल्ह्यात सुरु झाले.

> स्टँड-अप इंडिया योजनेतून गेल्या सहा वर्षात कोल्हापुरात एकूण १३३ कोटी ३४ लाख रुपयांचे कर्ज वितरण झाले आहे. या योजनेला चांगला प्रतिसाद आहे.
>
> **-गणेश गोडसे**, व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक

> जिल्ह्यात गेल्या तीन वर्षापासून स्टार्टअपची गती वाढली आहे. शैक्षणिक संस्था स्टार्टअपसाठी पुढे येत आहेत. त्यामुळे स्टार्टअपची संख्या आणखी वाढेल.
>
> **- प्रतीक ओसवाल**, संचालक, सिदम इनोव्हेशन अँड बिझनेस इन्क्युबेशन सेंटर

> विद्यार्थी, संशोधक, सर्वसामान्यांच्या अभिनव कल्पनांवर आधारित स्टार्टअपच्या प्रस्तावांना मार्गदर्शनासह गती देण्याचे काम शिवाजी विद्यापीठ करत आहे. विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली ६ स्टार्टअप सुरु आहेत.
>
> **- डॉ. पी. डी. राऊत**, सीईओ, एसयुके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फौंडेशन

Hello Kolhapur Gramin
Page No. 4 Jul 06, 2022
Powered by: erelego.com

(https://facebook.com/sharer.php?u=https://enewspapr.com/News/PUDHARI/AKH/2022/07/15/ArticleImages/19CAE71.jp

पुढारी

# कौशल्यवृद्धीकडे कल; तरुणाईस मिळतेय पाठबळ

## शिवाजी विद्यापीठात २५० स्टार्टअपची नोंद; १० नवसंकल्पनांना मान्यता

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राकडे आतापर्यंत २५० तरुण व नवसंशोधकांनी स्टार्टअपची प्राथमिक नोंदणी केली आहे. दहा उत्कृष्ट स्टार्टअप्सना मान्यता दिली असून त्यांना मार्गदर्शनाबरोबरच अनुदान उपलब्ध करून दिले जात आहे.

शिवाजी विद्यापीठात २०१८ रोजी नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्र स्थापन झाले. पश्चिम महाराष्ट्र स्टार्टअपचे हब होण्यासाठी प्रयत्न करण्याचा मानस केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी व्यक्त केला.

दीपक पवार हे सध्या उद्यमनगरमध्ये वेल्डर म्हणून काम करीत आहेत. त्यांनी स्टार्टअप



**जागतिक युवा कौशल्य दिन विशेष**

अंतर्गत कणिक मळणी यंत्र तयार केले आहे. सध्या घरी, वसतिगृह, रेस्टॉरंटमध्ये गव्हाचे पीठ हाताने मळून गव्हाचे रोटे बनवले जातात. ही प्रक्रिया वेळखाऊ आहे. याचा विचार करूनच कणिक मळणी यंत्र तयार केले. पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यामुळे हे यंत्र विकसित करू शकलो. कमीत कमी ते जास्तीत जास्त कोणत्याही प्रमाणात पीठ मळून घेते. मेहनत आणि वेळ




वाचते, असे पवार म्हणाले.

मुग्धा सावंत ही विद्यापीठाच्या टेक्नॉलॉजी विभागातील फूड सायन्सची विद्यार्थिनी आहे. तिने 'डिकॅफ : कॅफ्फेईन फ्री कॉफी' पर्याय तयार केला आहे. डिकॅफ हा कॉफी सारखा समान चव देणारे उत्पादन आहे. कॉफी बीन्स न वापरता त्यामध्ये समान चव विकसित केली आहे. हा पदार्थ प्रोटीन व कॅल्शियम जास्त प्रमाणात देतो. जास्त प्रमाणात कॉफी घेतल्यामुळे होणारे दुष्परिणाम लक्षात घेता हे उत्पादन बनवले आहे. काही आजारासाठी कॅफेन असणारे पदार्थ टाळावे लागतात, अशा समस्यांसाठी हे उत्पादन तयार केले आहे. जे कमीत कमी किमतीत स्थानिक पातळीवर उपलब्ध आहे, असल्याचे मुग्धाने सांगितले.

पारंपरिक ऊस लागवड खूप कष्ट आणि वेळखाऊ प्रक्रिया आहे. ही गोष्ट विचारात घेऊन शिवाजी विद्यापीठाचा माजी विद्यार्थी संग्राम पाटील याने ऊस लागवड यंत्र तयार केले आहे. ऊस लागवड व तोड, मजुरीचा खर्च वाढत असून शेतकऱ्यांना मजूर वेळेवर मिळत नाहीत. हे रोटरी मेकॅनिझमवर काम केलेले ट्रॅक्टर चालविणारे मशिन आहे. हे ड्रम व रोटरी डिस्कद्वारे बांधले जाते. शेतकऱ्यांच्या गरजेनुसार दोन ओळी, दोन छडीमधील वेगळे अंतर समायोजित करण्यासाठी उपयोगी असल्याचे संग्राम यांनी सांगितले.

पैलवान थंडाईस अमृत म्हणतात. पारंपरिक थंडाई बनवण्याची प्रक्रिया कठीण, वेळखाऊ आहे. त्यामुळे लोक घरी थंडाई बनवण्याचे टाळतात. आज रेडी टू ड्रिंक कॅटेगरीत अनोखी थंडाई सुरू करण्याचा विचार कोणी केला नव्हता. हा विचार करून शिवाजी विद्यापीठाचा माजी विद्यार्थी धनंजय वडेरने 'बदाम थंडाई' तयार केली आहे. हे पेय हार्मोन्स संतुलित स्थितीत पुनर्संचयित करते. ते बद्धकोष्ठता नियंत्रित करते, पचनक्रिया सुधारते, असे वडेर म्हणाले.

अस्थमा व फुफ्फुसाच्या आजाराच्या रुग्णांना नियमितपणे नेब्युलायझरची आवश्यकता भासते. त्यामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञान, स्वस्त दर व रुग्णांची गरज हे मुद्दे लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाचा माजी विद्यार्थी दिग्विजय आजरेकरने 'अल्ट्रा नेब्युलायझर' बनविले आहे. अल्ट्रा नेब्युलायझर विकसित केले असून नवीन जाळी तंत्रज्ञानाशी जुळवून घेते. मोबाईल फोन, पॉवर बँक, लॅपटॉप, कार चार्जर आदींसह ५ ते १२ व्ही मधील कोणत्याही यूएसबी पुरवठ्यासह वापरता येते. असे त्यांनी सांगितले.

My Kolhapur Edition
Jul 15, 2022 Page No. 1
newspaper.pudhari.co.in (http://newspaper.pudhari.co.in/)

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून स्टार्टअपना चालना

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्टार्टअप इनक्युबेशन सेंटरच्या 'एसयूके रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट फाऊंडेशन' या सेक्शन- ८ कंपनीमार्फत 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज' या उपक्रमाची निर्मिती केली आहे. ऑगस्ट महिन्याचे चॅलेंज हे 'इंटरनेट ऑफ थिंग्स' या संकल्पनेवर आहे. त्याद्वारे स्टार्टअपना चालना मिळणार आहे.

विद्यार्थी, संशोधक व नागरिकांना उद्भवणाऱ्या विविध समस्यांवर नावीन्यपूर्ण उत्तरे सुचविण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. उपक्रमांतर्गत दर महिन्याला एक विषय देऊन त्यावर विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी त्या संदर्भातील त्यांनी शोधलेले प्रश्न त्यावर शोधलेले कल्पक पर्याय अथवा उत्तर विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या वेबसाईट darb News and Event - Monthly Innovation Challenge या लिंकवरील गुगल फॉर्ममध्ये भरावयाचे आहेत.



सकाळ

# 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज'ची निर्मिती



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्टार्टअप इनक्युबेशन सेंटरच्या ''एसयुके रिसर्च अँन्ड डेव्हलपमेंट फाउंडेशन'' सेक्शन ८ कंपनीतर्फे ''मंथली इनोव्हेशन चॅलेंज'' उपक्रमाची निर्मिती केली आहे. त्याद्वारे विद्यार्थी, संशोधक व नागरिकांना उद्‌भवणाऱ्या विविध समस्यांवर नावीण्यपूर्ण उत्तरे सुचविण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. उपक्रमाअंतर्गत दर महिन्याला एक विषय देऊन त्यावर विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी त्याबाबत त्यांनी शोधलेले प्रश्न त्यावर शोधलेले कल्पक पर्याय अथवा उत्तर विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in वेबसाईटवरील News and Event - Monthly Innovation Challenge लिंकवरील गुगल फॉर्ममध्ये भरावयाचे आहे. या प्रक्रियेतून नावीन्यपूर्ण संकल्पनातून स्टार्टअप स्थापन करणे व त्याद्वारे तंत्रज्ञानाचे समाज हितासाठी प्रभावी हस्तांतरण करणे सोपे होणार आहे. या महिन्याचे चॅलेंज हे IoT (Internet of Things) या संकल्पनेवर असून, त्याद्वारे सामान्य माणसाच्या समस्यांवर नवसंकल्पना सादर करण्याचे आवाहन नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले आहे.

Kolhapur, Main
08/08/2022 Page No. 5

Advertise With Us | About Us
© Sakal 2020

सकाळ

# 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज'ची निर्मिती



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्टार्टअप इनक्युबेशन सेंटरच्या ''एसयुके रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट फाउंडेशन'' सेक्शन ८ कंपनीतर्फे ''मंथली इनोव्हेशन चॅलेंज'' उपक्रमाची निर्मिती केली आहे. त्याद्वारे विद्यार्थी, संशोधक व नागरिकांना उद्‌भवणाऱ्या विविध समस्यांवर नावीण्यपूर्ण उत्तरे सुचविण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. उपक्रमाअंतर्गत दर महिन्याला एक विषय देऊन त्यावर विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी त्याबाबत त्यांनी शोधलेले प्रश्न त्यावर शोधलेले कल्पक पर्याय अथवा उत्तर विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in वेबसाईटवरील News and Event - Monthly Innovation Challenge लिंकवरील गुगल फॉर्ममध्ये भरावयाचे आहे. या प्रक्रियेतून नावीन्यपूर्ण संकल्पनातून स्टार्टअप स्थापन करणे व त्याद्वारे तंत्रज्ञानाचे समाज हितासाठी प्रभावी हस्तांतरण करणे सोपे होणार आहे. या महिन्याचे चॅलेंज हे IoT (Internet of Things) या संकल्पनेवर असून, त्याद्वारे सामान्य माणसाच्या समस्यांवर नवसंकल्पना सादर करण्याचे आवाहन नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले आहे.

Kolhapur, Main
08/08/2022 Page No. 5

तरुण भारत

# विद्यापीठात स्टार्टअपला मिळणार चालना

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या स्टार्टअप इनक्युबेशन सेंटरच्या 'एसयुके रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट फाऊंडेशन' या सेक्शन ८ कंपनीमार्फत 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज' या उपक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे.

या अंतर्गत विद्यार्थी, संशोधक व नागरिकांना उद्भवणाऱ्या विविध समस्यांवर नाविण्यपूर्ण उत्तरे सुचविली जातात. या उपक्रमाअंतर्गत दर महिन्याला एक विषय घेऊन विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी त्यासंदर्भात त्यांनी शोधलेल्या प्रश्नावर कल्पक पर्याय दिले जातात. याचे उत्तर विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या वेबसाईटवरील News and Event - Monthly Innovation Challenge या लिंकवरील गुगल फॉर्ममध्ये भरावयाचे आहे. या प्रक्रियेतून नाविन्यपूर्ण संकल्पनातून स्टार्टअप स्थापन करून, तंत्रज्ञानाचे समाज हितासाठी प्रभावी हस्तांतरण करणे सोपे होईल. या महिन्याचे चॅलेंज हे Internet of Things या संकल्पनेवर असून सामान्य माणसाच्या समस्यांवर नवसंकल्पना सादर करण्याचे आवाहन नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. एम्. एस्. देशमुख यांनी केले.



- **'मंथली इनोव्हेशन चॅलेंज' या उपक्रमाची निर्मिती**
- **विविध प्रश्नांवर मिळणार कल्पक पर्याय**

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात आज स्टार्टअप यात्रा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीच्या प्रांगणात आज, शनिवारी दुपारी तीन वाजता स्टार्टअप यात्रा उपक्रम होणार आहे. त्यात उद्योग, स्टार्टअपना प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता, नावीन्यता विभागांतर्गत संकल्पनांची माहिती दिली जाणार आहे. त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. एस. एस. देशमुख यांनी केले.

लोकमत

# जिल्ह्यात ३० 'स्टार्टअप'ची नोंद

## स्टार्टअप यात्रा महाविद्यालये, आयटीआयनाही भेट देणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जिल्ह्यात आतापर्यंत विविध ३६ ठिकाणी स्टार्टअप यात्रेअंतर्गत ३० स्टार्टअपची नोंद झाली आहे. विविध महाविद्यालये, आयटीआय आणि विद्यापीठात ही यात्रा भेटी देत आहे. याअंतर्गत शिवाजी विद्यापीठातील 'एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाउंडेशन' या इनक्युबेशन सेंटरला शनिवारी भेट दिली.

यात्रेचे स्वागत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले. यात्रेचे मार्गदर्शन प्रद्युम्न आढाव आणि जिल्हा कौशल्य विकास केंद्राचे सहायक आयुक्त संजय माळी, कौशल्य विकास अधिकारी मोटे यांनी योजनांबाबत माहिती दिली. यावेळी डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात शनिवारी स्टार्टअप यात्रेचे स्वागत कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. यावेळी शेजारी पी. डी. राऊत, एम. एस. देशमुख, आर. के. कामत, पी. एस. पाटील आदी उपस्थित होते.

### १६ सप्टेंबरला स्पर्धा

स्टार्टअप यात्रा तीनस्तरावर काम करणार आहे. दि. १६ सप्टेंबर रोजी विद्यापीठात जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिर आणि सादरीकरण स्पर्धा होणार असल्याची माहिती डॉ. देशमुख यांनी दिली.

अडचणी दूर करण्याच्या माध्यमातूनच नव्या कल्पना जन्माला येतात. त्याला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाने स्टार्टअप यात्रेद्वारे पाऊल टाकले आहे. तुमची लहानशी कल्पना असेल, तर यामध्ये आवर्जून नोंदवा.

डॉ. दिगंबर शिर्के, कुलगुरू

Kolhapur Main
Page No. 2 Sep 04, 2022
Powered by: erelego.com

# नव्या कल्पनेतूनच स्टार्टअपची सुरुवात

## डॉ. डी. टी. शिर्के; शिवाजी विद्यापीठात स्टार्टअप यात्रेचे स्वागत

**कोल्हापूर, ता. ३ :** आजूबाजूला असलेल्या अडचणी दूर करण्याच्या माध्यमातूनच नव्या कल्पना जन्माला येतात. यातून नवे स्टार्टअप सुरू होतात. यासाठी शासनाने सुरू केलेल्या महाराष्ट्र स्टार्टअप यात्रा-२०२२ मध्ये तुमची लहानशी कल्पना असेल, तर आवर्जून नोंदवा, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठात राज्य नावीन्यता सोसायटीतर्फे 'स्टार्टअप यात्रा - २०२२' चे आज आगमन झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. त्यांनी व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी झेंडा फडकवून यात्रेचे स्वागत केले.



**कोल्हापूर : 'स्टार्टअप यात्रा - २०२२'चे झेंडा फडकवून स्वागत करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. शेजारी कुलगुरू डॉ. आर. के. कामत, डॉ. व्ही. एन. शिंदे, अजित चौगुले.**

यात्रेने जिल्ह्यात आतापर्यंत ३६ ठिकाणी भेटी दिल्या असून, त्यात ३० स्टार्टअपची नोंद झाली आहे. यात्रेने आज विद्यापीठात सुरू असणाऱ्या 'एसयुके रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट फाउंडेशन' या इनक्युबेशन सेंटरला भेट दिली व समाधान व्यक्त केले. त्यानंतर यात्रेचे मार्गदर्शन प्रद्युम्न आढाव व जिल्हा कौशल्य विकास केंद्राचे असिस्टंट कमिशनर संजय माळी, कौशल्य विकास अधिकारी श्रीमती मोटे यांनी विविध योजनांबाबत माहिती दिली. यात्रेच्या स्वागतासाठी डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखअधिकारी अजित चौगुले, नवोपक्रमचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, इनक्युबेशन सेंटरचे सीईओ डॉ. पी. डी. राऊत, कौशल्य विकासचे संचालक डॉ. ए. एम. गुरव उपस्थित होते.

Kolhapur, Main
04/09/2022 Page No. 2

पुढारी

# स्टार्टअप यात्रेच्या माध्यमातून नवसंकल्पना, व्यवसायाच्या संधी

## कुलगुरू डॉ. शिर्के

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र स्टार्टअप यात्रा हे महाराष्ट्र सरकारने पुढे टाकलेले पाऊल आहे. स्टार्टअप यात्रेच्या माध्यमातून नवसंकल्पना, नवीन व्यवसायाच्या संधी निर्माण होतील, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के यांनी केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात स्टार्टअप यात्रेचे आगमन झाल्यावर झेंडा फडकवून स्वागत करताना कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के. प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील, कुलगुरू डॉ. आर.के.कामत, प्र.कुलसचिव डॉ. व्ही.एन.शिंदे, डॉ. पी.डी.राऊत आदी.**

राज्यातील नावीन्यपूर्ण संकल्पना व नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत स्टार्टअप यात्रेचे आगमन शनिवारी शिवाजी विद्यापीठात झाले. यात्रेचे स्वागत झेंडा फडकवून कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

कुलगुरू शिर्के म्हणाले, १५ ऑगस्ट पासून सुरू झालेल्या यात्रेने जिल्ह्यात आतापर्यंत ३६ ठिकाणी भेटी दिल्या आहेत. त्यात ३० स्टार्टअपची नोंद झाली आहे. यात्रेचे मार्गदर्शक प्रद्युम्न आढाव, जिल्हा कौशल्य विकास केंद्राचे असिस्टंट कमिशनर संजय माळी यांनी स्टार्टअप व शासनाच्या विविध योजनांबाबत माहिती दिली. यात्रेच्या स्वागतासाठी डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनिश कामत, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, नवोपक्रमचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख, अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, इनक्युबेशन सेंटरचे सीईओ डॉ. पी. डी. राऊत, कौशल्य विकासचे संचालक डॉ. ए. एम. गुरव उपस्थित होते.

**एक लाखाचे अनुदान मिळणार..**

यात्रेबाबतची संपूर्ण माहिती, नावीन्यपूर्ण संकल्पना, त्याच्या इतर पैलूंची माहिती देण्यात येत आहे. १६ सप्टेंबर रोजी विद्यापीठात जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिर व सादरीकरण स्पर्धा होईल. नोंदणी केलेल्या नवउद्योजकांच्या संकल्पनांच्या सादरीकरणासाठी स्पर्धा होतील. जिल्हास्तरावर सर्वोत्तम कल्पना सादर करणाऱ्यांना २५ हजार रुपयांपर्यंतचे पारितोषिक दिले जाणार आहे. प्रत्येक सादरीकरण सत्रातील उत्तम दहा कल्पनांचे राज्यस्तरीय सादरीकरण तज्ज्ञ समितीसमोर करण्यात येईल. राज्यस्तरीय विजेत्यांना १ लाख रुपयांपर्यंतचे रोख अनुदान व आवश्यक पाठबळ पुरवण्यात येणार आहे.

Kolhapur Edition
Sep 4, 2022 Page No.
epaper.enavabharat.com

12 SEP 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्टार्टअपमधून चौदा प्रस्ताव राज्य शासनाकडे

- शिवाजी विद्यापीठातील सेक्शन-८ कंपनीकडील नोंदीत नवसंकल्पना प्रत्यक्षात उतरणार
- व्यवसायासाठी राज्य सरकारसह विद्यापीठ सर्वोतोपरी मदत करणार



**विद्यार्थ्यांनी आत्मनिर्भर व्हावे, यासाठी त्यांच्या संकल्पनांना व नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने स्टार्टअप सुरू केले आहे. शिवाजी विद्यापीठात सेक्शन -८ कंपनी सुरू केली असून यातून अनेक संशोधकांना पेटंटसह कंपनीची स्थापना करून दिली जाईल. सध्या विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक व समाजातील अनेक घटकांनी १४ संशोधनाचे प्रस्ताव पाठवले आहेत. या प्रस्तावांना तज्ज्ञांची मान्यता मिळाली असून, त्यांची स्वत:ची कंपनी किंवा पेटंट नोंदणीसाठी हे प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवले आहेत. विद्यापीठातील स्टार्टअपमधून अनेकजण आत्मनिर्भर बनतीलच पण इतरांनाही रोजगार उपलब्ध करून देतील, ही गोष्ट विद्यापीठाच्या दृष्टीने गौरवास्पद आहे.**

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ, महाविद्यालय आणि समाजातील अनेकांकडे भरपूर संकल्पना असतात. परंतु, या संकल्पना प्रत्यक्षात उरवण्यासाठी त्यांना व्यासपीठ व आर्थिक मदत मिळत नाही. या संकल्पनांना व्यासपीठ व निधी उपलब्ध करून देण्याचे काम विद्यापीठ स्टार्टअपच्या माध्यमातून करताना दिसत आहे. स्टार्टअपच्या माध्यमातून मुग्धा सावंत यांनी कॅफेन फ्री कॉफी: डिकॅफ बनवले आहे. शरीराला घातक असणारे कॉफीतील कॅफेन बाजूला काढले आहे. त्यामुळे शरीरावर होणारे दुष्परिणाम होणार नाहीत. तसेच विश्वजीत खाडे यांनी ऑर्डिनो स्टेल हे एक इलेक्ट्रॉनिक उपकरण तयार केले आहे. यातून हार्डवेअर कनेक्टीविटी, मॉनिटरिंग प्रयोग, हार्डवेअर स्टेटस मॉनिटरिंग कंट्रोल करता येते. डॉ. चिराग नारायण यांनी 'शिवतेज ऑईल' सांधेदुखीवरील हर्बल तेल तयार केले आहे. हे तेल हाडे व सांधे विकारावर आयुर्वेदिक दिर्घकालीन उपाय आहे. डॉ. सुप्रिया कुसाळे यांनी बॉयोफर्टीलायझर उत्पादन केले आहे. सेंद्रीय शेतीला पूरक 'सूर्या ॲग्रो बायोटिक' कंपनी स्थापन करून सूक्ष्मजीवांपासून जैविक खत तयार केले आहे. संग्राम पाटील यांनी ऊस लावणी यंत्र तयार केले असून, या यंत्राच्या सहाय्याने सरीतील व रोपातील अंतर योग्य ठेवून ऊसलावणी करता येते. डॉ. सागर डेळेकर यांनी ॲन्टीबॅक्टेरीयल पेंट तयार केला आहे. याचा उपयोग हॉस्पिटल आणि क्लिनिकमध्ये करता येतो. त्यांनी पेटंटसाठी प्रस्ताव सरकारकडे पाठवला आहे. धनंजय वडेर यांनी आरोग्यदायी 'बदाम थंडाई' तयार केली आहे. बध्दकोष्ठता नियंत्रण, पचनक्रिया वाढतेच पण रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. श्रीनिवास कुंभार यांनी 'शनी ऑपरेटिंग सिस्टम' तयार केली आहे. भविष्यात अनेक संस्था या सिस्टमचा वापर करण्याची शक्यता आहे. दिग्विजय आजरेकर यांनी 'अल्ट्रा' नेब्युलायझर तयार केले आहे. दम्यासह फुफुसांचा आजार असणाऱ्यांना वाफ घेण्यासाठी ही मशिन उपयोगी पडणार आहे. याला लाईटची गरज भासणार नसून मोबाईलवर ऑपरेट करता येईल. राजवर्धन शिंदे यांनी शरीराच्या स्कॅनिंगसाठी थ्रीडी ॲप तयार केले आहे. यासह अन्य संशोधकांनी आपले प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवले आहेत. राज्य शासनाची मान्यता मिळाल्यास या संशोधकांच्या नवसंकल्पना प्रत्यक्षात पेटंट किंवा कंपनीच्या स्वरूपात नावारूपाला येतील. यातून हे संशोधक स्वत: आत्मनिर्भर बनतीलच परंतू अन्य दहाजणांना रोजगार उपलब्ध करून देतील.

## अनेकांना रोजगार मिळणार

महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत स्टार्टअप यात्रा राज्यभर फिरली. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर कोणाचीही नवसंकल्पना नोंदवता येते. ती समाजोपयोगी असल्यास व्यवसायासाठी मान्यता व आवश्यक साधने उपलब्ध करून दिली जातील. अडचणीतून मार्ग काढण्यासाठी नवसंकल्पनांची निर्मिती होते. यालाच व्यवसायाचे स्वरूप मिळेल.

## स्टार्टअप हब करण्याचा मानस

शिवाजी विद्यापीठातील इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून पश्चिम महाराष्ट्रात स्टार्टअप हब निर्माण करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. ज्यांच्या नवसंकल्पना आहेत त्यांना विद्यापीठ मदत करून, उद्योजक तयार करण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यासाठी समाजातील सर्वांनी आपल्या नवसंकल्पनेची विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर नोंद करावी.

**डॉ. एम. एस. देशमुख (संचालक, इनोव्हेशन इन्क्युबेशन ॲण्ड लिंकेजस)**